# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०७ एप्रिल, २०१७ / चैत्र १७, १९३९ ( शके )**

**(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
**(३) कृषी आणि फलोत्पादन मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २५**

---

### मौजे उमराळे (ता.वसई, जि.पालघर) येथील रस्त्यावरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(१) * ३०४९७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी, पालघर यांच्या दिनांक १३ ऑक्टोंबर, २०१६ रोजीच्या पत्र क्र. महसूल/क-१/टे-७/हक्कनोंद/कावि-१०/१६ मधील आदेशानुसार मौजे उमराळे येथील शेतकऱ्यांच्या वहिवाटीच्या रस्त्यात अडथळा निर्माण करणारे भिंतीचे बांधकाम निष्कासित करण्याची कारवाई व त्याबाबतचा पंचनामा निवासी नायब तहसिलदार, वसई यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी करुन त्यानुसार त्याच दिवशी तहसिलदार, वसई यांनी क्र. म.शा/कक्ष-१/टे-जमीनबाब-१/क.सु.क्र.०३ व १७ अन्वये जिल्हाधिकारी, पालघर यांना अहवाल पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भिंतीचे बांधकाम अर्धवट निष्कासित करुन प्रत्यक्षात मात्र सदर भिंतीचे बांधकाम पुर्णत: निष्कासित करण्यात आल्याचा खोटा पंचनामा तयार करुन व कारवाईच्यावेळी तेथे उपस्थित नसलेल्या शेतकऱ्यांच्या घरी जाऊन निवासी नायब तहसिलदार यांनी पंचनाम्यावर शेतकऱ्यांच्या सह्या घेतल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खोटा पंचनामा व अहवालाद्वारे शासनाची व शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या तहसिलदार व निवासी नायब तहसिलदार यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच वहिवाटीच्या रस्त्यातील अनधिकृत भिंतीचे बांधकाम निष्कासित करुन वहिवाटीचा रस्ता मोकळा करण्याकामी होणारा खर्च महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे कसूरदार व्यक्तिकडून वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे उमराळे, ता.वसई, जि.पालघर येथील स.नं. ५६/१७ या जमिनीच्या जाण्या येण्यासाठी पुर्वापार असलेल्या रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे रस्त्याच्या वहिवाटीबाबत सदरहू शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचे न्यायालयात मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ चे कलम २३(२) अन्वये दावा दाखल केला होता. सदर दाव्याच्या अनुषंगाने दिनांक २४/०४/२००८ रोजी तहसिलदार, वसई यांना फेरचौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले होते. सदर आदेशाच्या अनुषंगाने तहसिलदार, वसई यांचे न्यायालयात फेरचौकशी दाव्यात दिनांक ०७/०७/२०१५ रोजी आदेश पारीत होऊन सदर दाव्यात नमूद रस्ता पुर्वापार जाणे येणेचा असल्याचे सिध्द झाल्यामुळे ५ फूट रुंदीचा रस्ता मोकळा करुन देण्याचे आदेशित करण्यात आले. सदर स.नं. ५६/१७ या जागेवरील अनधिकृत बांधकाम तहसिलदार, वसई यांनी दिनांक १८/११/२०१६ रोजी विविध शासकीय यंत्रणेच्या मदतीने निष्कासित केले आहे. सदर अतिक्रमण काही प्रतिवादी यांचे समक्ष तोडण्यात आलेले असून त्यांनी पंचनाम्यावर स्वाक्षरी करताना काही तक्रार असल्याचे नमूद केलेले नाही. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे संबंधिताकडून अतिक्रमण निष्कासनाचा खर्च वसुल करण्याबाबत तजविज ठेवण्यात आली आहे.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) येथे बनावट सार्वजनिक बांधकाम विभाग वेब मॅनेजमेंट कंपनी स्थापन करून गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२) * २८४०० डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरी देण्याचे आमिष दाखवून बनावट सार्वजनिक बांधकाम विभाग वेब मॅनेजमेंट कंपनी स्थापन करुन खोटी नियुक्ती पत्रे देऊन १२० बेरोजगार तरुणांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी मुख्य संशयिताकडून रुपये २,८६,००,०००/- मालमत्ता दिनांक २८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास जप्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेरोजगार तरुणांना दिलेल्या नियुक्ती पत्रावरील सार्वजनिक बांधकाम विभागाचे शिक्के व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या बनावट असल्याचे सिध्द झाले असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन सचिव श्री.श्यामलकुमार मुखर्जी व श्री.देकाटे यांच्या स्वाक्षरीचे नमुने तपासण्यासाठी पाठविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून सदर समितीने अहवालात श्री.भुषण शेवाळे यांनी महाराष्ट्र शासन व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे नांवाचा दुरूपयोग करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग वेब मॅनेजमेंट कंपनी स्थापन करून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. विषयांकित प्रकरणातील आरोपीविरुध्द गुन्हा घडलेल्या कालावधीत मिळालेल्या आर्थिक रक्कमेतून एकूण रुपये २,६३,३६,१०८/- (रुपये दोन कोटी त्रेसष्ट लाख छत्तीस हजार एकशे आठ फक्त) एवढ्या किंमतीची मालमत्ता आरोपींकडून उपविभागीय पोलीस अधिकारी मालेगाव शहर, उप विभाग, मालेगाव यांनी जप्त केली आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम खात्याचे शिक्के व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या बनावट असल्याचे सिध्द झाले आहे.

चौकशी समितीने सर्व कागदपत्रांची तपासणी करुन तत्कालीन सचिव श्री.श्यामलकुमार मुखर्जी व श्री.देकाटे यांच्या स्वाक्षऱ्या देखील बनावट असल्याचे अभिप्राय दिले आहेत.

(३) होय.

(४) सदर गैरव्यवहारामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागातील कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांचा सहभाग दिसून आलेला नाही. श्री.भूषण शेवाळे व इतर तीन यांचे विरोधात दिनांक १७/२/२०१६ रोजी फिर्यादी नं. ३३/२०१६ नुसार फिर्याद दाखल केली असून संबंधित इसमांना दिनांक १७/०२/२०१६ रोजी अटक करण्यात आली आहे. चौकशीअंती दिनांक १६/०५/२०१६ रोजी या प्रकरणातील आरोपीविरुध्द मा.अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय, मालेगाव येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नेर (जि.यवतमाळ) तालुक्यातील कृषी विभागात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३) * ३०६६१ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेर (जि.यवतमाळ) तालुक्यातील कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी नेर, मंडळ अधिकारी राजस्व, तलाठी दगड धानोरा यांनी संयुक्त स्थळ निरीक्षण करुन पूर्णपिकांचे नुकसान दाखवून जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना तीन वेळा खोटा अहवाल सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

(२) होय, खरीप २०१३ मध्ये मौजे दगड धानोरा येथील ३ शेतकऱ्यांनी नुकसानीच्या अहवालामध्ये त्यांचे नाव नसल्यामुळे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना तक्रार दिलेली होती. त्यानुषंगाने चौकशी करण्यात आलेली असून त्यामध्ये सदर शेतकऱ्यांचे ५० टक्केच्या आत नुकसान झाले असल्यामुळे त्यांची नावे नुकसानीच्या अहवालात समाविष्ट करण्यात आलेली नसल्याचे चौकशीत निष्पन्न झालेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मु.वडगांव (पोतनीसांचे) (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील शेतकऱ्यांना रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४) * ३०८०७ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.वडगांव (पोतनीसांचे) (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या शेत जमिनीत जाणे-येण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे स्थानिक ४०-५० शेतकऱ्यांनी दिनांक ७ जानेवारी, २०१३ व ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी व तहसिलदार, खंडाळा यांच्याकडे दिनांक १०/१२/२०१२, ६/३/२०१३ व २८/८/२०१५ व माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडगांव येथील गट क्र. १९७, १९८, २०४, २०६ व २०८ मधील जमिनीस गृहनिर्माण सोसायटीने अनधिकृत कंपाऊंड घालून रस्ता बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार धरणग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या शेत जमिनीत जाणे-येण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे वडगांव (पोतनीसांचे), ता.खंडाळा, जि.सातारा येथील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीत जाणे-येणेसाठी रस्ता मिळावा याबाबत स्थानिक शेतकऱ्यांचे जिल्हाधिकारी, सातारा कार्यालयाकडे तसेच तहसिलदार खंडाळा यांचे कार्यालयाकडे लेखी निवेदन/अर्ज प्राप्त झाले होते.

मौजे वडगांव येथील गट क्र. १९७, १९८, २०४, २०६ व २०८ मधील जमिनीचे रेखांकन उपविभागीय अधिकारी, वाई यांचे कार्यालयाकडील दिनांक ०१/०३/२०१५ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आले आहे. उक्त जमिनी मे.भूमी इस्टेट या संस्थेच्या नावे दाखल असून सदर संस्थेने त्यांचे स्वत:च्या जागेत कंपाउंड घालून रस्ता बंद केल्याचे दिसून आले असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ प्रमाणे अर्धन्यायिक कामकाज चालवून शेत जमिनीस येणे जाणे करीता रस्ता खुला करून देणेबाबत तहसिलदार खंडाळा, जि.सातारा यांनी दिनांक १५/०३/२०१७ रोजी आदेश पारित केले आहेत व त्याप्रमाणे संबंधित भागात जमिनीत जाणे-येणेसाठी रस्त्याबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तांदळा (ता.गेवराई, जि.बीड) गावातील शेतकऱ्यांना**
**जमिनीचा मावेजा देण्याबाबत**

**(५) * ३०५४२ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ वरील तांदळा (ता.गेवराई, जि.बीड) गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी विशेष प्रकल्प विभागाने संपादित न करताच काम पूर्ण केल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी महामार्गात रस्ता रोको आंदोलन केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

शेतकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन केले आहे हे खरे आहे. परंतू, शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये केलेले रस्ता रोको आंदोलन महामार्ग क्र. २२२ चे रूंदीकरणासाठी तांदळा (ता.गेवराई, जि.बीड) गावातील संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीबाबत नसून सन १९६१ पासून अस्तित्वात असलेल्या महामार्गाच्या संपादनाविषयी केलेले आहे.

(२) जिल्हाधिकारी, बीड यांनी संबंधित शेतकरी व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत सुचित केले आहे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दिग्रस ते जांब (ता.कंधार, जि.नांदेड) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(६) * ३०४११ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार (जि.नांदेड) तालुक्यातून दिग्रस ते जांब जाणारा रस्ता व हरबळ ते दिग्रसकडे येणारा मुख्य राज्यमार्ग असून या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) रस्ते विकास योजना २००१-२०२१ नुसार प्रश्नाधीन रस्ता रा.मा.क्र. २५० असून सद्य:स्थितीत रस्ता सुस्थितीत आहे. रस्त्यावरुन वाहतुक सुरळीत चालू आहे. रस्त्याची पूर्ण करण्यात आलेली कामे विहीत मानकाप्रमाणे, विनिर्देशानुसार दर्जा व गुणवत्ता राखून पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरीत कामे प्राधान्याने व निधी उपलब्धतेनुसार करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ओला व उबेर खाजगी टॅक्सी सेवा चालकांवर निर्बंध घालण्याबाबत**

**(७) * २७७९४ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, नवी मुंबई तसेच, ठाण्यासह राज्यातील विविध भागात अनेक वर्षांपासून चालणाऱ्या काळ्या पिवळ्या टॅक्सींच्या व्यवसायावर ओला व उबेर खाजगी टॅक्सी सेवा चालकांमुळे परिणाम होऊन काळ्या पिवळ्या टॅक्सी चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओला व उबेर खाजगी टॅक्सी सेवा चालकांवर निर्बंध घालण्याच्या मागणीसाठी जय भगवान रिक्षा संघटनेच्यावतीने वारंवार आंदोलन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ओला व उबेर खाजगी टॅक्सी सेवा चालकांवर निर्बंध घालण्याच्यादृष्टीने नियमावली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अशा आशयाची निवेदने काळी-पिवळी टॅक्सी संघटनाकडून प्राप्त झालेली आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) समुच्चयक कंपन्याव्दारे चालविण्यात येणाऱ्या संकेतस्थळ आधारीत टॅक्सी सेवाबाबत सेवेचे विनियमन करण्यासाठी दिनांक ०४/०३/२०१७ च्या अधिसूचनेन्वये “महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम २०१७” करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नवीन दराप्रमाणे फरकाची रक्कम अदा करण्याबाबत**

**(८) * २९९९६ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा येथील प्रकल्पांकरिता संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला वाढीव दराने देण्यात यावा असे निर्देश केंद्र शासनाने दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजी मुल्यांकन तिथी ग्राह्य धरण्यास सांगूनही राज्य शासनाने अजूनही केंद्र शासनाच्या निर्देशाची अंमलबजावणी केली नसल्याचे तसेच राज्य शासनाने संपादित जमिनी करीता जुना कायदा १८९४ च्या कलम ४ नुसार बाजारभाव निश्चित करीत असल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे दिनांक ५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजीची नवीन मुल्यांकन तिथी लागू करून नुकसान झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नवीन दराप्रमाणे फरकाची रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे,

(२) प्रकरणी केंद्र शासनाने दिनांक २६/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार कार्यवाहीत असलेल्या प्रकरणाबाबत केंद्र शासनाच्या सदर अभिप्रायामध्ये विसंगती दिसून येत असल्याने केंद्र शासनाकडे दिनांक २७/०४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये फेरमार्गदर्शन अपेक्षिले होते.

शासनाच्या दिनांक २७/०४/२०१६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिनांक १४/०६/२०१६ रोजीच्या पत्रान्वये भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार कार्यवाहीत असलेल्या प्रलंबित प्रकरणांचे संपूर्ण तपशीलासहीत केंद्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे संदर्भ करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे माहितीसह संदर्भ करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय विकास योजनेत यवतमाळ जिल्हयाचा समावेश करण्याबाबत**

**(९) * २९२७९ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय विकास योजनेतून यवतमाळ या आत्महत्याग्रस्त जिल्ह्याला वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राष्ट्रीय विकास योजनेत यवतमाळ जिल्ह्याचा समावेश करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत विदर्भ व मराठवाडा विभागात दूध उत्पादन वाढीसाठी राबवावयाच्या विशेष प्रकल्पामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील अमूल दूध संघाच्या कार्यक्षेत्रातील गावे वगळून इतर गावे समावेश करणे शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**परभणी जिल्हयात रिलायन्स जिओ कंपनीतर्फे अवैधरित्या खोदकाम केल्याबाबत**

**(१०) * २७९२१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात रिलायन्स जिओ कंपनीतर्फे खोदण्यात येत असलेल्या कामासाठी जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४८, तसेच जमिनीचा वापर निर्बंध नियम १९६८ मधील कलम ५ व ६ आणि खाणी व खनिजद्रव्ये नियमन विकास १९५७ च्या नियमाप्रमाणे जिल्हाधिकारी, परभणी यांच्या पुर्व परवानगी व प्रमाणित परवानगी न घेता अवैधरित्या खोदकाम केल्याचे तसेच, सदर खोदकामात कंपनी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी नियमभंग करीत असल्याबाबतच्या तक्रारी परभणी येथील नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, महसूल व प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे e-mail द्वारे नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खोदाईसाठी कमी क्षेत्राची खोदाई परवानगी देवून जास्तीचे कामे करणे, शासनाची परवानगी मिळण्यापूर्वीच कामे करणे, रस्त्यापासून प्रमाणित अंतर न सोडताच खोदकाम करणे, इतर कामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रिलायन्स कंपनी व दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्याविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) परभणी येथील एक सामाजिक कार्यकर्ता व पत्रकार यांचे परभणी जिल्हयात रिलायन्स जिओ कंपनीतर्फे खोदाई करून केबल टाकण्याकामी झालेल्या अवैध खोदकामाबाबतचे दिनांक ०६/०२/२०१७ रोजीचे निवेदन प्रधान सचिव, महसूल यांना प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून सदर प्रकरणाच्या चौकशीकरीता उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली पथक गठीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) बस स्थानकातून अतिदुर्गम भागात तसेच लांब पल्ल्याच्या बससेवा सुरु करण्याबाबत

**(११) * २९३६७ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभेरी, झाप (ता.जव्हार, जि.पालघर) तसेच तालुक्यातील इतर आदिवासी पाडे व गावातील नागरीकांना दळणवळणासाठी तालुक्याच्या ठिकाणी जाण्या-येण्यासाठी बससेवा नसल्यामुळे नागरीकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार परिवहन आगारातून लांब पल्ल्याच्या विशेषत: जव्हार-मुंबई, जव्हार-पुणे, जव्हार-नाशिक, जव्हार-रत्नागिरी अशी बससेवा नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबतच्या तक्रारी व निवेदने शासनाकडे केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अतिदुर्गम भागात तसेच लांब पल्ल्याच्या विशेष बससेवा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) व (३) राज्य परिवहन जव्हार आगारामार्फत जव्हार-पुणे, जव्हार-नाशिक-कळवण या लांब पल्ला मार्गावर बससेवा सुरु आहे. जव्हार-मुंबई मार्गावरील फेरी कमी भारमानामुळे बंद करण्यात येऊन प्रवाशांच्या सोईकरिता ठाणेपर्यंत सदर फेरी चालविण्यात येत आहे. जव्हार-रत्नागिरी मार्गावर सुमारे १८ वर्षापुर्वी बससेवा सुरु होती. मात्र अत्यल्प भारमानामुळे सदर बससेवा बंद करण्यात आली आहे.

जव्हार तालुक्याच्या परिसरातील दुर्गम भागात जव्हार-दाभेरी मार्गावर सागपाणी-रुईघर ३ फेऱ्या व जव्हार-झाप मार्गावर ७ फेऱ्या सुरु आहेत. तसेच इतर बहुतांश सर्वच गावांना राज्य परिवहन सेवा पुरविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात अवैधरित्या विटभट्ट्या सुरू असल्याबाबत

**(१२) * ३०७३७ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात वीटभट्ट्यासाठी पाच परवाने मिळाले असताना तब्बल ४३५ वीटभट्ट्या सर्रास सुरु असल्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आली नाही. माहे एप्रिल, २०१६ ते आजतागायत विटभट्टीसाठी माती उत्खननाचे एकूण ३८ परवाने देण्यात आले असून, त्यापोटी एकूण रुपये ५,७५,३१०/- एवढी स्वामीत्वधनाची रक्कम शासनास प्राप्त झाली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील झिरंग नदीवरील कॉजवे नादुरुस्त असल्याबाबत

**(१३) * २९९१३ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मौजे गठमठ (राऊतवाडी) आणि कणकवली तालुक्यातील मौजे कासार्डे (साटमवाडी) या दोन गावांमधून वाहणाऱ्या झिरंग नदीवरील कॉजवे नादुरुस्त होऊन धोकादायक बनलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी पुल बांधण्यासाठी गडमठ आणि कासार्डे ग्रामस्थांनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ठिकाणी पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) प्रस्तूत प्रकरणी मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) व (४) प्रश्नाधीन कॉजवे हा इतर जिल्हा मार्ग-११ या जिल्हास्तरीय रस्त्यावरील असून सदरचा रस्ता देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे अखत्यारित आहे. प्रश्नाधीन कॉजवेच्या ठिकाणी पुलाचे काम करावयाचे झाल्यास ते निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधिन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**लासलगांव-विंचुर (जि.नाशिक) रस्त्यावरील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१४) * २८४०२ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगांव-विंचुर (जि.नाशिक) रस्त्यावरील पुलाच्या कामाकरिता रुपये ५० लाख खर्च करूनही निकृष्ट कामामुळे पुलावर वर्षभरातच मोठे खड्डे पडले असून सदर पुलावरून वाहतूक बंद झाल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाच्या कामाच्या दर्जाची गुणनियंत्रण मंडळाकडून तपासणी व एकुण कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्यावरील जुन्या व अरुंद पुलाच्या रुंदीकरणासाठी या पुलाला समांतर नवीन पुलाचे बांधकाम करण्यात आले आहे. पावसाळ्यात पुलाच्या जोडरस्त्यावर काही ठिकाणी पडलेले खड्डे खडी व डांबराने भरण्यात आले असून पुलावरून वाहतूक सद्य:स्थितीत सुरळीत चालू आहे.

(२) पुलाच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या बांधकाम साहित्याची गुणवत्ता दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांचेमार्फत तपासण्यात आलेली आहे. बांधकाम साहित्याची गुणवत्ता समाधानकारक आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोटयाळ ते सापळा (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर)**
**रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(१५) * २९७८४ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोटयाळ ते सापळा (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) रस्त्याचे अर्धवट डांबरीकरण केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

प्रश्नांकित रस्ता हा प्रजिमा ५२ चा भाग आहे. मोटयाळा ते सापळा या गावांदरम्यानच्या रस्त्याची लांबी ५ कि.मी. इतकी आहे. या लांबीत १.९३० कि.मी. लांबीच्या भागात मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम मार्च, २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. तसेच उर्वरीत लांबीत नियतकालीक पृष्ठभाग दुरुस्तीचे (खड्डे भरणे) काम करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत रस्त्यावरुन वाहतूक सुरळीतपणे चालू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिरवळ (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील सेवा रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(१६) * ३०८०८ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सातारा रस्त्यालगत (MH-४) शिरवळ (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील शिर्के कंपनी ते पंढरपूर फाटा रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या सेवा रस्त्याचे काम अपूर्ण असल्यामुळे अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सेवा रस्ता पुर्ण करण्याकरिता स्थानिक ग्रामस्थांनी ७-८ वर्षापासून मागणी करुन व मोर्चे काढूनही सदर रस्ता अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर सेवा रस्ता पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत असलेल्या पुणे ते सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या प्रकल्पामध्ये शिर्के कंपनी ते पंढरपूर फाटा ह्या ४ कि.मी. लांबीमध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या सेवा रस्त्याच्या बांधकामाचा समावेश आहे. एकूण ८.०० कि.मी. सेवा रस्त्यांपैकी ४.५८ कि.मी. चे बांधकाम पूर्ण झालेले असून ०.७२ कि.मी. चे काम प्रगतीत आहे. उर्वरित २.७ कि.मी. सेवा रस्त्याचे काम हाती घेण्यात येत असून ते लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना सवलतकाराला देण्यात आल्या आहेत,

तसेच शिर्के कंपनी ते पंढरपूर फाटा ह्या भागामध्ये सन २०१५ मध्ये ३ व सन २०१६ मध्ये ४ अपघात झाल्याची नोंद असून सदरील अपघात सेवा रस्त्यांच्या अपूर्ण कामामुळे झाले नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पारवा फाट ते हदगाव (ता.हदगाव, जि.नांदेड) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१७) * ३०४४२ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारवा फाटा ते हदगाव (ता.हदगाव, जि.नांदेड) रस्त्याकरिता डांबरीकरणाचे काम मंजूर असून सुध्दा स्थानिक अधिकाऱ्यांच्या संगनमताने कमी डांबराचा वापर करुन निकृष्ट दर्जाचे काम केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित रस्ते रा.मा. २५१, लांबी ८.०० किमी व प्रजिमा-१२, लांबी १७ किमी असे आहेत. या दोन्ही रस्त्यांसाठी मजबूतीकरणाची ६ कामे मंजूर आहेत. त्यापैकी १ काम प्रगतीत व ५ कामे पूर्ण झाली आहेत. सर्व कामे निविदेतील तरतूदीप्रमाणे करण्यात आली आहेत.

सद्य:स्थितीत रस्ते सुस्थितीत असून वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंबाजोगाई (जि.बीड) उपप्रादेशिक परिवहन**
**कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१८) * २७८०६ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने वाहनधारकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयाच्या स्थापनेच्या म्हणजेच सन २००४ पासून या कार्यालयात अपुरा कर्मचारी वर्ग असून अंबाजोगाई सोबतच स्थापन झालेल्या अकलूज, बारामती, कराड, लातूर, नांदेड, उस्मानाबाद येथील कार्यालयांना संपूर्ण कर्मचारी वर्ग व स्वत:ची इमारत असतांना अंबाजोगाई कार्यालय मात्र भाड्याच्या जागेतच आणि अपुऱ्या कर्मचारी वर्गावर चालत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबाजोगाई कार्यालयातील रिक्त जागा भरण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई या कार्यालयासाठी अधिकारी/कर्मचारी यांची एकूण १४ पदे मंजूर करण्यात आलेली असून, त्यापैकी ६ पदे रिक्त आहेत. जनतेची गैरसोय होऊ नये यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर येथून २ कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्तीही सदर कार्यालयात करण्यात आली आहे.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई हे कार्यालय सध्या भाड्याच्या इमारतीत सुरू असून, कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या ४ हेक्टर (१० एकर) क्षेत्रामध्ये इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(३) होय.

(४) एकूण ६ रिक्त पदांपैकी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक या संवर्गातील ३ पदे रिक्त असून या संवर्गातील रिक्त १८८ पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्याबाबत**

**(१९) * २७७७९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक १६६७४ ला दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी, गंगाखेड, पालम व सोनपेठ (जि.परभणी) या तालुक्यातील तहसिलदारांनी शेतकऱ्यांना वाटप करावयाचे आर्थिक अनुदान वाटप न केल्याने संबंधित तहसिलदारांविरूध्द कारवाई केल्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, परभणी यांनी मागविला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उपविभागीय अधिकारी, परभणी, गंगाखेड व पाथरी यांनी दिलेल्या अहवालावरून संबंधित दोषी तहसिदारांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.
(२) याबाबत तहसिलदार परभणी, गंगाखेड, पालम व सोनपेठ यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. तथापि, बाधित शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्यात आले असून, उर्वरीत अनुदान समर्पित केले आहे. सबब अनुदान व्यपगत झालेले नसल्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) बसस्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) * २९३६८ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) येथील बसस्थानकात प्रवाशांकरीता आसन, पंखे, लाईट, शौचालय इत्यादी सोयी-सुविधे अभावी प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे तसेच बसस्थानक परिसरात अनेक अनधिकृत बांधकामे व स्टॉल असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार आगारातील बसेस अतिशय जीर्ण व मोडकळीस अवस्थेत भंगार झालेल्या असून अशा बसेस मधून प्रवास करणे त्रासदायक होत असल्याच्या तक्रारी प्रवाशांनी शासनाकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बसस्थानकाचे नुतनीकरण करून सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच, बस स्थानकातील अनधिकृत बांधकाम हटवून आगारात नवीन बसेस पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) जव्हार बसस्थानकात प्रवाशांसाठी आसन, पंखे, लाईट व शौचालय अशा मुलभूत सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या असून, प्रवाशांची कोणतीही गैरसोय होत नाही. तसेच, बसस्थानकाच्या आवारात कोणतेही अनधिकृत स्टॉल अथवा अनधिकृत बांधकाम नाही.

बसस्थानकातील वाहनताफा सुस्थितीत असून, गत ३ वर्षामध्ये जव्हार आगारास १० नवीन बसेस दिलेल्या असून ६ जुन्या बसेस मोडीत काढण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जव्हार बसस्थानकाच्या नुतनीकरणासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिल्ली-मुंबई कॉरीडॉरच्या प्रकल्पात बाधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत

**(२१) * ३०६१७ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातून प्रस्तावित दिल्ली-मुंबई कॉरीडॉरच्या प्रकल्पाला स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध असूनही शासनाने प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरु ठेवली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या प्रकल्पात बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन उक्त भूसंपादन प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

रायगड जिल्हयातील दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पासाठी ५ औद्योगिक क्षेत्राकरिता मिळून एकूण १२१४०.८६९ हे.आर क्षेत्र म.औ.वि. अधिनियम, १९६१ च्या तरतूदीनुसार वाटाघाटीने नुकसान भरपाईचा दर निश्चित करुन संपादित करण्यात येत आहेत. प्रथम टप्प्यात २ औद्योगिक क्षेत्रातील १० गावामधील क्षेत्र शेतकऱ्यांच्या संमतीने २०६०.६८२ हे.आर संपादित केले असून आणखी साधारणत: २०० हे.आर क्षेत्राची संपादनास शेतकऱ्यांची संमती प्राप्त झाली आहे.

(२) दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर करिता महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या तरतूदीनुसार शेतकऱ्यांशी वाटाघाटीने दर ठरविण्यात आले असून शेतकऱ्यांच्या संमतीने भूसंपादनाची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, माणगांव व उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) काळप्रकल्प-२, माणगांव यांचेमार्फत केली जात आहे. तसेच म.औ.वि. महामंडळाचे प्रचलित धोरणानुसार विकल्प देणाऱ्या भूधारकांना १५ टक्के विकसित भूखंड प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिला जाणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माझगांव, मुंबई न्यायालयाची इमारत १५ वर्षातच धोकादायक ठरविण्यात आल्याबाबत

**(२२) * २८४०४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २५८८८ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील माझगांव न्यायालयाची सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेली इमारत १५ वर्षातच धोकादायक ठरविण्यात आल्या प्रकरणी मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्वाधिकारे चौकशी करून शासनास सादर केलेला शिफारस अहवाल दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजी शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालातून नमूद प्रमुख शिफारशींचे स्वरुप काय आहे व अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने इमारतीचे बांधकाम करणारे सार्वजनिक बांधकाम विभागातील दोषी अभियंत्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी दोषी अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्याबाबत प्रमुख शिफारस केली आहे.

मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचा शिफारस अहवाल लक्षात घेऊन, प्रस्तुत प्रकरणी जबाबदार अभियंत्यांसह संबंधित कंत्राटदाराविरुध्द FIR दाखल करण्याचा तसेच सद्य:स्थितीत शिस्तभंगविषयक कारवाईस उपलब्ध असलेल्या एका अभियंत्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील लांब पल्याच्या बससेवा सुरु करण्याबाबत

**(२३) * ३०७०१ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा हा आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्याच्या सिमेलगत असल्याने व नांदेड येथे वैद्यकीय सेवेची चांगली सुविधा असल्याने नांदेडसह मराठवाडयातील मोठ्या शहरातील नागरीक येथे वैद्यकीय सेवा व इतर खरेदीसाठी येत असतात. राज्य परिवहन महामंडळातर्फे संपूर्ण राज्यभर प्रवाशी वाढवा अभियान सुरु असतांनाच राज्य परिवहन महामंडळाच्या उच्चस्तरीय अधिकारी व महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांकडून जिल्हयातील व राज्यातील लांबपल्याच्या २५० बसेस रद्द केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुक्रमाबाद ते नांदेड ही शिवा एक्सप्रेस बस पुन्हा बंद झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लांब पल्ल्याच्या बसेस रद्द केल्यामुळे हजारो प्रवाशांना इच्छीत स्थळी जाण्या-येण्यास त्रास होत असल्याने उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बससेवा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) राज्य परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागाद्वारे चालविण्यात येणारी आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या राज्यांच्या सिमेलगतची वाहतूक सुरु आहे.

राज्य परिवहन महामंडळाद्वारे राज्यातील तोट्यात चालणाऱ्या, थेट प्रवाशी नसणाऱ्या तसेच प्रवाशी प्रतिसाद कमी असणाऱ्या एकूण २७५ फेऱ्या माहे जुलै, २०१६ पासून बंद करण्यात आलेल्या आहेत.

(२) नाही. सदर फेरी नांदेड-मुक्रमाबाद व देगलुर-मुक्रमाबाद अशी चालविण्यात येत होती. परंतु सध्या प्रवाशांच्या मागणीनुसार सदर फेरी नांदेड व्हाया देगलूर ते मुक्रमाबाद अशी चालविण्यात येत आहे.

(३) राज्य परिवहन महामंडळाकडून माहे जुलै, २०१६ पासून बंद करण्यात आलेल्या २७५ फेऱ्यांपैकी प्रवासी मागणीनुसार १०२ फेऱ्या पुन:श्च सुरु करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**परभणी जिल्ह्यातील शिर्शी पुल बांधकामातील गैरप्रकाराबाबत**

**(२४) * २७७१८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील शिर्शी पूल बांधकाम निधी मिळण्यासाठी अधिकाऱ्यांनी संगनमत करून खोटे दस्ताऐवज केंद्र शासनाकडे सादर करून गैरव्यवहार केल्याबाबतचा आक्षेप महालेखापाल यांनी चौकशीत निदर्शनास आणला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर प्रकरणी दोषी अधिकारी, कंत्राटदार व इतर यंत्रणा यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य यांच्या परिच्छेदातील आक्षेप कॅगच्या अहवालात समाविष्ट करण्यात आले आहेत.
(२) व (३) कॅगचा अहवाल प्राप्त झाला असून त्यातील आक्षेपांबाबत अनुपालन सादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

----------------

**मौजे पाम (जि.पालघर) येथे सिरॉन ड्रग्ज कंपनीने वहिवाटीचा रस्ता बंद केल्याबाबत**

**(२५) * २९५११ श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक २६०६९ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पाम (ता.जि.पालघर) येथील सर्व्हे क्र.३०, ६४, ७५/३-ब व १६४ या जमिनीतून स्थानिक शेतकऱ्यांच्या वहिवाटीतील वडिलोपार्जित जागेत सर्वे क्र.३० मध्ये सिरॉन ड्रग्ज या कंपनीने मोठा गेट बसविल्यामुळे शेतकऱ्यांचा जाण्या-येण्याचा रस्ता ३/४ वर्षापासून बंद झालेला असून याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, मा.कृषी मंत्री, जिल्हाधिकारी, पालघर, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, पालघर यांचेकडे दिनांक २०, २१ व २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायब तहसिलदार/तलाठी यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी व दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी तहसिलदार व तलाठी व इतर कर्मचारी यांनी समक्ष जागेवर स्थळ पाहणी करुन लुपिन कंपनीने बनवून दिलेला रस्ता व शेत जमिनीची पाहणी करुनही रस्ता खुला केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ अंतर्गत शेतकऱ्यांचा वहिवाटीतील असलेला रस्ता खुला करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे-पाम, ता.जि.पालघर येथील स.नं.३०, ६४, ७५/३ ब व १६४ या जमिनीतून स्थानिक शेतकऱ्यांच्या वहिवाटीतील वडिलोपार्जित जागेत जाणे-येण्याच्या रस्त्यात स.नं.३० मध्ये मे.सिरॉन ड्रग्ज ॲण्ड फार्मास्यूटिकल्स लिमिटेड या कंपनीने मोठा गेट बसविल्यामुळे शेतकऱ्यांचा जाणे-येणेचा रस्ता बंद केल्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे तक्रारी दाखल केलेल्या आहेत.

सदर कंपनीचे पूर्वेकडील गेट व दक्षिणेकडील गेट खुले करण्यात आले असून सदर रस्ता आज रोजी मोकळा आहे. तसेच वृंदावन पार्कचे विकासक यांनी पत्रे लावून बंद केलेला रस्ता देखील खुला करण्यात आला असून सदर रस्त्याची कायमस्वरुपी उपाययोजना व्हावी या दृष्टिने तहसिलदार, पालघर यांनी दिनांक ०७/०१/२०१७ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळपाहणी करण्यात आली असून सदरचा रस्ता स्थानिक शेतकऱ्यांच्या वहिवाटीसाठी खुला आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.